महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

http://admission.dvet.gov.in; www.dvet.gov.in; itiadmission@dvet.gov.in

# शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०१९ सत्रासाठी प्रवेश सूचना

## ITI Admission Portal/ प्रवेश संकेतस्थळ : http://admission.dvet.gov.in

Admission Notification No. २०१९-०२, दि. १३ ऑगस्ट, २०१९

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०१९ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यात येत आहेत.

राज्यातील विविध भागांमध्ये निर्माण झालेल्या पुर परिस्थितीमुळे सद्य:स्थितीत चौथ्या प्रवेश फेरीतील निवड झालेले उमेदवारांना प्रवेशनिश्चिती करण्यासाठी संबंधित संस्थेत उपस्थित राहण्यास अडचणी निर्माण होत आहे. तसेच दि. १४ ऑगस्ट, २०१९ पासुन सुरु होणाऱ्या समुपदेशन फेरीसाठी देखील प्रवेशोच्छुक उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपस्थित राहण्यास अडचणी निर्माण होवू शकतात.

प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी त्यांचे आदेश दि. ३१ जुलै, २०१९ अन्वये राज्यातील ४४ नवीन व ४५ अस्तिवात असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील नव्याने संलग्नीत केलेल्या तुकड्यांमध्ये ऑगस्ट २०१९ सत्रापासुन प्रवेशास मंजुरी दिली आहे.

सबब प्रवेश सत्र ऑगस्ट २०१९ चे सुधारीत प्रवेश वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

**प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१०.०** | **चौथी प्रवेश फेरी** | | |
| १०.३ | चौथ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे. | ०७ ऑगस्ट, २०१९ स.९.०० वाजेपासून | १६ ऑगस्ट, २०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **११.०** | **नव्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे :** | | |
| ११.१ | विहीत मुदतीत प्रवेश अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांना समुपदेशन फेरीत प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज पुर्ण भरल्यानंतर प्रवेश अर्जाची छापिल प्रत (Print Out) घेणे, अर्ज स्विकृती केंद्रात (राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत) मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज शुल्क भरुन अर्ज निश्चित (Confirmation) करणे. | २२ जुलै, २०१९ स.९.०० वाजेपासून | १६ ऑगस्ट, २०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ११.२ | समुपदेशन फेरीसाठी पात्र उमेदवार व नव्याने अर्ज भरलेल्या उमेदवारांची समुपदेशन फेरीसाठी राज्यस्तरावरील एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | १७ ऑगस्ट, २०१९, सायं. ५.०० वाजता | |
| **१२.०** | **जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| १२.१ | "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती" मधील प्रपत्र ५ मध्ये देण्यात आलेल्या जिल्हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये त्या जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील रिक्त जागांसाठी जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे प्रवेशोच्छुक व पात्र उमेदवारांची त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार निवड करण्यात येईल.<br>राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील चौथ्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर रिक्त राहिलेल्या जागा जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर जिल्हास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करणे. | १७ ऑगस्ट, २०१९, सायं. ५.०० वाजता | |
| १२.२ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित जिल्हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदविणे. | १९ ऑगस्ट, २०१९ स.८.०० वाजेपासून | १९ ऑगस्ट, २०१९ सायं.४.०० वाजेपर्यंत |
| १२.३ | हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून संबंधित जिल्हा स्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन संबंधित जिल्हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रकाशित करणे. | १९ ऑगस्ट, २०१९, सायं.५.०० नंतर | |
| १२.४ | जिल्हास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे | | |
| | १२.४.१ जिल्हास्तरावर गुणवत्ता क्रमांक १ ते ५०० | २० ऑगस्ट, २०१९; स.८.०० ते सायं ५.०० | |
| | १२.४.२ जिल्हास्तरावर गुणवत्ता क्रमांक ५०१ ते १००० | २१ ऑगस्ट, २०१९; स.८.०० ते सायं ५.०० | |
| | १२.४.३ जिल्हास्तरावर गुणवत्ता क्रमांक १००१ ते पुढे | २२ ऑगस्ट, २०१९; स.८.०० ते सायं ५.०० | |
| १२.५ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी निवड झालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपस्थित राहून सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेशशुल्क भरुन प्रवेश निश्चितीची कार्यवाही करणे. | २० ऑगस्ट, २०१९ स.८.०० वाजेपासून | २३ ऑगस्ट, २०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत |

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१३.०** | **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| १३.१ | **फक्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील** जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर संस्थास्तरीय समुपदेशन फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करणे. | २४ ऑगस्ट, २०१९, सायं. ५.०० वाजता | |
| १३.२ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | २६ ऑगस्ट, २०१९ स.८.०० वाजेपासून | २६ ऑगस्ट, २०१९ दु.३.०० वाजेपर्यंत |
| १३.३ | हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन संबंधित संस्थेत प्रकाशित करणे. | २६ ऑगस्ट, २०१९, सायं.५.०० नंतर | |
| १३.४ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे | २७ ऑगस्ट, २०१९ स.८.०० वाजेपासून | २८ ऑगस्ट, २०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| १३.५ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत **त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.** उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | २७ ऑगस्ट, २०१९ स.८.०० वाजेपासून | २८ ऑगस्ट, २०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **१४.०** | **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| १४.१ | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व जिल्हास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरीनंतर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध होतील | १० जुलै, २०१९ स.९.०० वाजेपासून | १३ सप्टेंबर, २०१९ सायं.५.०० वाजेपर्यंत |

१. प्रवेशाची सविस्तर "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती" सर्व शासकीय व खाजगी औ. प्र. संस्थांमध्ये दि. ०३ जून, २०१९ पासून उपलब्ध करुन देण्यात येत आली आहे. (दर रु.६० मात्र) तसेच सदर माहितीपुस्तिका प्रवेश संकेत स्थळावर Pdf स्वरुपात Download साठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवार व पालकांनी माहितीपुस्तिकेचे सखोल अवलोकन करावे.

२. जिल्हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी घेण्यात येणार आहे. सदर संस्थांची यादी "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती" मधील प्रपत्र ५ मध्ये देण्यात आली आहे तसेच प्रवेश संकेतस्थळावर Pdf स्वरुपात Download साठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत असून केंद्रीय पध्दतीने उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी नोंद घ्यावी.

४. केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेत सहभागी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व त्यातील व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या कायम विनाअनुदानित तत्वावर शासन मान्यताप्राप्त व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषद (NCVT) यांचेशी संलग्न आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांमधील प्रवेशित व प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची परीक्षा - अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा (AITT) ही शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील उमेदवारांप्रमाणेच घेण्यात येवून उत्तीर्ण उमेदवारांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) बहाल करण्यात येते. उमेदवारांनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी प्रवेश घेण्यापुर्वी, ते ज्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेत आहेत ती व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी NCVT शी संलग्नीत आहे का ते NCVT-MIS पोर्टल www.ncvtmis.gov.in वर ITI Search या मथळ्याखाली तपासावे. असंलग्नीत व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची परीक्षा संचालनालयामार्फत घेण्यात येणार नाही.

५. राज्यातील सर्व शासकीय व मान्यता प्राप्त खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व या संस्थेतील संलग्न व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची यादी http://admission.dvet.gov.in, www.dvet.gov.in तसेच www.ncvtmis.gov.in या संकेतस्थळांवर देखील उपलब्ध आहे. तरी प्रवेशोच्छुक सर्व उमेदवारांनी सदर संकेतस्थळांना एकवेळ अवश्य भेट दयावी.

६. **वरील प्रवेश वेळापत्रक सूचक दर्शक असून त्यात बदल संभवतो. अद्ययावत प्रवेश वेळापत्रक प्रवेश संकेतस्थळावर व सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच नोंदणीकृत उमेदवारांना SMS व्दारे वेळोवेळी कळविण्यात येईल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी वेळोवेळी प्रवेश संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.**

Sd/-

स्थळ: मुंबई
दि.: १३ ऑगस्ट, २०१९

(दीपेन्द्र सिंह कुशवाह, भा.प्र.से)
संचालक